# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

# प्रेसनोट

**CB/54/2026**

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक २४/०८/२०२६ |
|---|---|

## ‘ नवी मुंबई, गुन्हे शाखा, कक्ष-१ वाशी यांनी सोनसाखळी चोरीच्या गुन्हयातील ०२ आरोपींना केली अटक ’

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.दीपक साकोरे, पोलीस सह आयुक्त, श्री.प्रमोद शेवाळे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) व श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा) यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात घडलेले मालमत्तेचे सर्व गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने नवी मुंबई, खारघर पोलीस ठाणे, गुन्हा रजि.नं. ९१/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६), ३(५) या दाखल गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान गुन्हे शाखा कक्ष १ वाशीचे पथकाने घटनास्थळ व आजुबाजुच्या परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी केली. प्राप्त सी.सी.टी.व्ही. फुटेजमधील आरोपीचा पेहराव व गुन्हयात वापरलेली मोटरसायकल यावरुन गुप्त बातमीदारांच्या मदतीने सदर गुन्हयातील आरोपी निष्पन्न केले. निष्पन्न आरोपीत हे सराईत गुन्हेगार असल्याचे समजले, त्या आधारे आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

**गुन्हयातील अटक आरोपींची नावे :-**

१) नौशाद मुस्ताक आलम उर्फ सागर, वय ३२ वर्ष, राह. प्रकाश चाळ, रूम नं. ०१, सेक्टर ९, कामोठे, नवी मुंबई

२) प्रशांत राजु मगर उर्फ प्रशांत भगवान वाघमारे उर्फ प्रशांत बबन वाघमारे, वय ३६ वर्ष, राह. यु टर्न ब्रीजखाली, व्हाईट हाऊससमोर, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे एम.आय.डी.सी. नवी मुंबई यांना दिनांक १८/०८/२०२६ रोजी १९:३५ वा. अटक व त्यांची दिनांक २४/०८/२०२६ रोजी नंतर न्यायालयीन कोठडी मंजुर आहे. यापुर्वी आरोपी क्र.०१ याचेवर एकुण ४१ व अरोपी क्र.०२ याचेवर एकुण ०६ घरफोडी, चोरी व सोनसाखळी जबरी चोरी सारखे गुन्हे दाखल आहेत.

सदर अटक आरोपीकडे कौशल्यपूर्ण तपास केला असता अटक आरोपींनी खारघर, कोपरखैरणे व रबाळे परिसरात जबरी चैन चोरीचे आणखी ०५ गुन्हे केल्याचे कबूल केले. गुन्हयाचे तपासात अटक आरोपी याचेकडून ७,३९,६२७/- रू. किंमतीच्या ६९.९५० ग्रॅम वजनाच्या ०६ सोन्याच्या चैनी व ३५,०००/-रू.किंमतीची काळया रंगाची होंडा कंपनीची शाईन मोटार सायकल क्र. MH-05-CF-0716 हस्तगत करण्यात आली असुन गुन्हयाचा अधिक तपास गुन्हे शाखा कक्ष-१ वाशी हे करीत आहे.

<u>उघडकीस आणलेले गुन्हे</u> :-

१) खारघर पो. ठाणे, गु.र.क्र. ९१/२०२६, भा.न्या.सं. कलम ३०९(६), ३(५) प्रमाणे
२) कोपरखैरणे पो. ठाणे गु.र.क्र. ९३/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०९(६),३(५) प्रमाणे
३) कोपरखैरणे पो. ठाणे गु.र.क्र. १७६/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०९(६),३(५) प्रमाणे
४) कोपरखैरणे पो. ठाणे गु.र.क्र. २०८/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०९(६),३(५) प्रमाणे
५) रबाळे पो. ठाणे गु.र.क्र. १६६/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०९(६),३(५) प्रमाणे
६) रबाले पो. ठाणे गु.र.क्र. ४२२/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०९(६),३(५) प्रमाणे

सदरची उल्लेखनिय कामगिरी श्री.भाऊसाहेब ढोले, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ०१ वाशीचे वपोनि/विकास घोडके, सपोनि/निलेश बनकर, पोउपनिरी/अभय काकड, सफौ/अशोक खैरे, पोहवा/१८३७, देवेंद्र सुर्यवंशी, पोहवा/४६१७, विश्वास भोईर, मपोहवा/९५८, अंजली विशे, मपोहवा/१६१, स्वाती सुर्वे, पोना/२७६८, अझहर मिर्झा, पोशि/३०७६, सचिन पाटील व पोशि/३८४३, विशाल सावरकर यांनी केली आहे.

★★★★★★★★★★★